ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 9 | October - 2016

Indian Streams Research Journal

# माळशिरस तालुक्यातील पर्यावरण जनजागृतीत जनसंज्ञापन माध्यमांची भुमीका

डॉ. आर. एल. गायकवाड
विभाग प्रमुख , शंकरराव मोहिते महाविदयालय, अकलूज ता. माळशिरस जि. सोलापूर.



## प्रस्तावना

२० व्या शतकाच्या सुरुवातीस औदयोगीकरण, भांडवलशाही, उदारमतवाद या गोष्टीचा उदय झाला. यामध्येच जगाची लोकसंख्या वाढल्याने मानवाचे राहणीमान, सरासरी, आयुष्यमान वाढून नवनवीन व्यवस्था उदयास येवू लागल्या या वेगवेगळ्या व्यवस्था समाजास विकासाच्या दिशेकडे घेवून जाण्यास कारण ठरु लागल्या. यामध्ये विकसीत होण्याच्या कलाकडे जास्त लक्ष दिल्याने पर्यावरणाकडे दुर्लक्ष होऊ लागले.मानवाच्या सभोतालचे पर्यावरण समाजाच्या विकासावर अनुकुल व प्रतिकुल परिणाम घडवून आणेत. सद्य स्थितीमध्ये पर्यावरणात घडणारे बदल हे मानवाच्या हस्तक्षेपामुळे घडत आहेत. त्यातच वरील बदलांचा वेग दिवसेदिवस वाढतच आहे. हे बदल मानवाच्या उदयाच्या पिठीवर घातक परिणाम घडवून आणतील यात शंका नाही. हे चित्र सध्या दिसू लागले आहे. मानवनिर्मीत पर्यावरणाच्यासमस्या अभ्यासण्यासाठी व त्या समस्येवर उपाययोजनासाठी पर्यावरण जनजागृती महत्वाची आहे. जागतीक पातळीवर सन १९७२ पासून अंतरराष्ट्रीय पर्यावरण परिषदांचे आयोजन करुन पर्यावरण जनजागृतीसाठी प्रयत्न सुरु केले आहेत.

## संशोधन अभ्यास क्षेत्र

माळशिरस तालुका हा सोलापूर जिल्हाच्या पश्चिम उत्तर दिशेला वसलेला आहे. या तालुक्याचा विस्तार १७°, ३६[1] उत्तर ते १८° १[1] उत्तर अक्षवृत्त व ७४° ४२[1] पुर्व ते ७५° ते १३[1] पुर्व रेखावृत्ता दरम्यान आहे. सोलापूर जिल्हामध्ये माळशिरस तालुक्याचे पाचवे स्थान आहे. २०११ च्या जनगणनेनुसार ४८५६४५ एवढी लोकसंख्या आहे व तालुक्याचे क्षेत्रफळ १६०८०१ हेक्टर ऐवढे आहे. माळशिरस तालुक्यात ११२ महसुली खेडी आहेत.

## उद्दिष्टे

१) वृत्तपत्रातुन येणाऱ्या पर्यावरणीय संवर्धनाच्या आशयाचा अर्थ स्पष्ट करणे.
२) टी. व्ही. वरील पर्यावरणीय जाहिरातींचे मापन करणे.
३) रेडीओ या जनसंज्ञापन माध्यमांचा पर्यावरणाशी असलेला संबंध स्पष्ट करणे.
४) वृत्तपत्र, टी. व्ही. व रेडीओ यांच्या मार्फत प्रसिध्द झालेला पर्यावरणीय वृत्ताचे विविध पर्यावरणीय घटकांनुसार पृथ्यकरण करणे.

## संशोधन अभ्यास पध्दती

प्रस्तुत क्षेत्रिय संशोधन अभ्यासाची माहिती दोन पध्दतीने संकलीत केली.

### अ) प्राथमिक माहिती -

संशोधन अभ्यास क्षेत्रातील निवडलेल्या गावांमध्ये प्रत्यक्ष भेटी देवून ३२४६ लोकांकडून प्रश्नावलीच्या सहाय्याने प्रसार माध्यमांची (जनसंज्ञापन माध्यमांची) माहिती मिळविली. गावातील टि. व्ही. रेडिओ व वृत्तपत्र या संज्ञापन माध्यमाच्या वापरासंदर्भात माहितीचे संकलन केले. ती माहिती संकलीत करुन प्रस्तुत संशोधनासाठी वापरली.

**ब) दुय्यम माहिती -**

टी. व्ही रेडीओ, वृत्तपत्र वापरणाऱ्या कुटुंबाची माहिती घेवून या प्रसार माध्यमांवरती येणाऱ्या पर्यावरणीय संर्वधनाच्या बातम्यांचे कार्यक्रमांचे जाहीरातीचे तसेच पर्यावरण संवर्धनसाठी दिलेल्या वेळेचे मापन केले गेले. या आकडेवारीची प्रस्तुत संशोधन अभ्यास पध्दतीत आशय घेवून विश्लेषण मांडण्यात आले आहे.

वरील दोन्ही पध्दतीतून प्रस्तुत क्षेत्रीय संशोधन अभ्यासाची माहिती उपलब्ध केली गेली.

**निष्पती -**

**तक्ता क्र. १ संशोधन अभ्यास क्षेत्रातील जनसंज्ञापन माध्यामांच्या वापराचे स्थिती विश्लेषण**

| अ. क्र. | जनसंज्ञापन माध्यम | होय | नाही | कचित |
|---|---|---|---|---|
| १ | टि. व्ही. | १०१५ | ६७ | - |
| २ | रेडिओ | ६५० | ३३७ | ९५ |
| ३ | वृत्तपत्र | ८२७ | २५५ | - |
| | **एकुण** | **२४९२** | **६५९** | **९५** |

**तक्ता क्र. ३ टी. व्ही. वृत्तपत्र, रेडीओ या प्रसार माध्यमांवरील पर्यावरणीय बातम्या पाहणाऱ्या लोकांचे संख्यकिय विश्लेषण.**

| अ. क्र. | प्रसार माध्यमे | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | टी. व्ही. | ९६० | १२२ |
| २ | रेडीओ | ४४५ | ६३७ |
| ३ | वृत्तपत्र | ५८५ | ४९७ |
| | **एकुण** | **१९९० (६१. ३१%)** | **१२५६ (३८.६९%)** |

**तक्ता क्र. ५ पर्यावरणीय संर्वधनासाठी उपाय योजना करणाऱ्या संशोधन क्षेत्रातील लोकांचे विश्लेषण.**

| अ. क्र | जनसंज्ञापन माध्यमे | संर्वधनासाठी उपाययोजतात | | |
|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | कचित |
| १ | टी. व्ही. | ९३५ | १४७ | ०० |
| २ | रेडीओ | ४१५ | ५१० | १५७ |
| ३ | वृत्तपत्र | ५८५ | ४८० | १७ |
| | **एकुण** | **१९३५** | **११३७** | **१७४** |

**विवेचन**

प्रस्तुत संशोधनावरुन निष्पतीचे निष्कर्श पुढील प्रमाणे आहेत.

संशोधन अभ्यास क्षेत्रातील टि. व्ही. या जन संज्ञापन माध्यमांच्या पाहण्याचा दृष्टीकोन ९३.८०% प्रस्तुत लोकांचा आहे व फक्त ६.१९% लोकच या माध्यमाचा वापर करीत नाहीत. या वरुन असे निर्देशनास येते की टि. व्ही. या प्रसार माध्यमाचा पगडा या संशोधन क्षेत्रावरती असलेला दिसून येतो. या अभ्यास क्षेत्रातील टि. व्ही. या जनसंज्ञापन माध्यमाच्यां कार्यक्रमाचे विश्लेषण पाहिले तर सर्वच कार्यक्रम पाहण्याचा लोकांची संख्या ६३२ आढळून आली व त्यांनतर क्रिडा २२९ बातम्या १८० मनोरंजन, १६९ कृषी ८३ आणि विशिष्ट असा कोणताच नाही असे ५३ लोकांनी सांगितले गेले. यावरुन प्रस्तुत संशोधन अभ्यास क्षेत्रातील लोकांचा या माध्यमाकडे पाहण्याचा दृष्टीकोन दिसून येतो. सर्वच कार्यक्रम पाहण्याऱ्या लोकांची संख्या जास्त असल्याने त्यांच्यामध्ये टि. व्ही संदर्भात विशेष आवड आसलेली दिसते.

पर्यावरणीय बातम्यांचा संदर्भात आकडेवारीचा जनादेश पाहिल्यावर १२२ लोक या संदर्भात नकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त करतात म्हणून संशोधन अभ्यास क्षेत्रातील लोकांचा पर्यावरण विषया संदर्भात जाणीव, जागृती करुन देण्याची आवश्यकता दिसून येते. आणि संर्वधना बाबत १४७ लोका प्रस्तुत संशोधन क्षेत्रात उपाय योजत नाहीत जरी १३५ लोक उपाय योजत असले तरी संर्वधनाची जाणीव १४७ लोकांमध्ये करणे सध्य स्थितीची गरज असलेली प्रस्तुत संशोधनावरुन स्पष्ट होते. तसेच आशय आकलनाचे प्रमाणही जास्त कमी असल्याने या जनसंज्ञापन माध्यमांचा पर्यावरण विषयांच्या संदर्भात सकारात्मक उपयांसाठी वापर करणे गरजेचे आहे.

रेडिओ या जनसंज्ञापन माध्यमाच्या बाबत प्रस्तुत संशोधन क्षेत्रातील जनसमुद्यांची कृती फारशी पर्यावरणा संर्वधनाच्या दृष्टीने व सकारात्मक नसलेली दिसते. प्रस्तूत संशोधन क्षेत्रातील एकुण लोकसंख्येपैकी या प्रसार माध्यमाच वापर करणाच्या लोकसंख्येचे प्रमाण ६५० वापर नाही करणाऱ्यांचे प्रमाण ३३७ आणि कदाचित वापर करणाऱ्यांचे प्रमाण ५ असलेल प्रस्तुत संशोधनाअंती निर्देशनास आले आहे.

यामधील रेडिओ या जनसंज्ञापन माध्यमांच्या पर्यावरणीय बातम्या व संदर्भ दाखले ऐकणाऱ्या जनसमुदायाच्या कौल अत्यंत कमी तो ४४५ लोक व न ऐकणाऱ्या जनसमुद्याचा कौल जास्त ६३७ लोक असलेला दिसला यावरुन या प्रसार माध्यमांद्वारे पर्यावरण विषयाच्या जागृतीच्या प्रयत्नात सहभाग अल्प असलेला दिसतो. तसेच या माध्यमांचा वापर करुन पर्यावरणीय संर्वधनासाठी उपाय योजना करणाऱ्या संशोधन अभ्यासातील लोकांचे प्रमाण अत्यंत कमी असलेले दिसते. यावरुन संशोधन अभ्यास क्षेत्रात जनजागृतीची व पर्यावरण शिक्षणाची गरज असलेली दिसते.

वृत्तपत्र - वृत्तपत्र या जनसज्ञापन माध्यमाच्या वापराच्या संदंभात जनमताचा संशोधन अभ्यास क्षेत्रातील कौल पाहिल्यास तो जास्त म्हणजे ८२७ लोक दिसतो हे प्रमाण ७६.४३% आहे. पण वृत्तपत्रामधून येणाऱ्या पर्यावरणीय बातम्यांचे व लेखांचे वापरण्याचे प्रमाण कमी असलेले निर्देषनास आले आहे. यावरुन संशोधन क्षेत्रातील जनसमुदाय वृत्तपत्राची गोडी लावणे व त्यामधील पर्यावरणीय बातम्या व लेखा यांच्या संदर्भात माहिती देण्याची गरज असलेले निर्देषणास येते. उपाय योजनांच्या संदर्भात आकडेवारी पाहिली तर प्रस्तुत संशोधना अंती असे सिध्द होते की, जनसमुदाय या माध्यमांन मार्फत पर्यावरणीय उपाय योजना करतात व ४५.९३ जनसमुदाय पर्यावरणीय उपाय योजना करत नाहीत यासाठी पर्यावरण शिक्षण, जनजागृती करणे गरजेचे आहे हे संशोधनाअंती स्पष्ट होते.

टी. व्ही., वुत्तपत्र व रेडीओ या प्रसार माध्यमातुन पर्यावरण अभ्यासास प्रसिध्दी देणे त्याद्वारे समाजाचे उद्बोधन करणे पर्यावरण शिक्षण देणे जनजागृती करणे, असे प्रयत्न करुन पर्यावरण संरक्षणासाठी प्रयत्न केले जातील.

## निष्कर्ष

प्रस्तुत संशोधन क्षेत्रातील निरीक्षणावरुन रेडिओ या जनसज्ञापन माध्यमाचे चित्र अस्पष्ट दिसून आले कारण प्रस्तुत संशोधनाअंती या प्रसार माध्यमाचा अलिकडील काळातील वापर कमी झाल्याने आणि विज्ञानाच्या युगात माहितीपटस बसून ऐकण्याची क्षमता नविन पिढीत नसल्याने या संदर्भात अलीकडील काळात पर्यावरणाच्या दृष्टीने विचार करण्याची गरज आहे.

वृत्तपत्र या जनसज्ञापन माध्यमांच्या वापराचे प्रमाण संशोधन क्षेत्रात जास्त आहे. पण वृत्तपत्रामधील पर्यावरणीय बातम्या, कात्रण, लेख या संदर्भात माहिती जाणून घेण्याची प्रवृत्ती कमी असलेली दिसते. म्हणून ग्रामीण भागात पर्यावरण शिक्षणाचे जनजागृती कार्य करण्यासाठी वृत्तपत्र महत्त्वाची भूमिका बजावतात. यासाठी वृत्तपत्रांनी पर्यावरणीय बातम्यांना, लेख आणि प्रदुषण स्थितीच्या कात्रांना स्थान देण्याची आवश्यकता असलेली प्रस्तूत संशोधन क्षेत्रावरुन स्पष्ट होते. वरील सर्व विवेचनावरुन असे स्पष्ट होते की, टी. व्ही., रेडिओ, वृत्तपत्र या प्रसार माध्यमांची पर्यावरणीय वृत्तास प्रसिध्दी देण्याची आवश्यकता असल्याचे दिसते. तसेच बदलत्या पर्यावरणीय घटना-घडामोडीचा विचार करता असे सांगता येईल की, प्रसार माध्यमांनी पर्यावरणीय घटनांना जास्तीत जास्त प्रसिध्दी देवून समाजाचे उद्बोधन करण्याची गरज आहे. हे झाले तर पर्यावरण जनजागृतीचे भविष्यातील मोठे काम प्रसार माध्यमांद्वारे घडून येवू शकेल.

## संदर्भ

१) ढेरे ए. एम., पवार सी. बी., पाटील डी. ए., पर्यावरण अभ्यास आक्षवंद प्रकाशन, अकलूज, ऑगस्ट, २००५.
२) Dhere A. M., Pawer C.B. & Patil D. A. natural resoures Environmental Studies Phadue Publications Kolhapur, Nov. २००५.
३) Sinah-S Environmental Geogrophy June, २०००.
४) ढेरे ए. एम., पाटील डी. ए., पवार सी. बी., पर्यावरणाचे बदलते अंतरंग सोलापूर जिल्ह्यातील बदलत्या पर्यावरणीय परिस्थितीचा अभ्यास आक्षवंद प्रकाशन, अकलूज, १६ ऑगस्ट, २००६.
५) ढेरे ए. एम., पाटील डी. ए., पवार सी. बी., पर्यावरण शिक्षण एफ. वाय. जे. सी. फडके, प्रकाशन कोल्हापूर ऑगस्ट, २००७.
६) पर्यावरण शास्त्र - डॉ. मोहन बाबरे, मंजुषा पब्लिकेशन्स - नळदुर्ग